## नियमित दिवाणी दावा क्र. १०३/२०१७ मधील नि.क्र.१६ वरील आदेश.

१. सदरचा अर्ज प्रतिवादीने त्याचेविरुध्द झालेला विना कैफीयतचा आदेश रद्द होऊन, कैफीयत स्वीकारण्यात यावी यासाठी केलेला आहे.

२. प्रतिवादीने कथन केले आहे की, सदर दाव्यातील दावा मिळकतीबाबत प्रतिवादीस जुनी महत्वाची कागदपत्रे मुदतीत उपलब्ध होवू शकली नाहीत. त्यामुळे प्रतिवादीस मुदतीमध्ये कैफीयत देता आली नाही. त्यामुळे प्रतिवादीविरुध्द विना कैफीयतचा आदेश झालेला आहे. शेवटी प्रतिवादीने त्याचेविरुध्द झालेला विना कैफीयतचा आदेश रद्द होवून त्याची कैफीयत स्वीकारण्यात यावी अशी विनंती केली.

३. वादीने या अर्जावर म्हणणे देवून हरकत घेतली आहे व प्रतिवादीने अर्जामध्ये योग्य ते कारण दाखविलेले नाही असे कथन केलेले आहे. सबब, प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा व मंजूर करावयाचा झाल्यास रु.२०००/-खर्च देण्याचा आदेश व्हावा.

४. वादीतर्फे श्री. काशिद वकील व प्रतिवादीतर्फे श्री. व्ही.ए.मुरुमकर यांचा युक्तीवाद ऐकला.

५. सदरचा दावा वादीने हद्द निशाण्या कायम करुन मिळणेसाठी व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीने या अर्जासोबत त्याची कैफीयत दाखल केलेली आहे. प्रतिवादीविरुध्द झालेला विना कैफीयतचा आदेश रद्द केल्यास प्रतिवादीस त्याची बाजु मांडण्याची संधी मिळणार आहे व त्यामुळे अभिलेखावर खरी वस्तुस्थिती समोर येवून दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यास मदत होणार आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता, पुढीलप्रमाणे आदेश करणे न्यायोचित होईल. सबब आदेश,

**आ दे श**

१. अर्ज रक्कम रु.२००/- च्या खर्चाने मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची रक्कम प्रतिवादीने वादी यांना देणेची आहे.

(खुल्या न्यायालयात निवेदित व जाहीर)

सही/-
**(ए. एम. मुजावर)**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

दिनांक : ०७/०३/२०१८.